# जेईई–मेन २०१७ च्या अर्जातील महत्त्वाचे बदल

**मिशन ॲडमिशन**

**अभियांत्रिकी प्रवेशाच्या जेईई–मेन २०१७ परीक्षेचे ऑनलाइन अर्ज www.jeemain.in या संकेतस्थळावर २ जानेवारी २०१७ पर्यंत उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांची ओळख व पुरावा यासाठी आधार कार्ड नोंदविणे बंधनकारक असून, पूर्वीप्रमाणे अंगठ्याची निशाणी अपलोड करण्याची आवश्यकता नाही.**

**हेमचंद्र शिंदे, बारामती**

**आधार कार्डचा उपयोग :** विद्यार्थ्यांची ओळख पटविण्यासाठी इतर अनेक कागदपत्रांऐवजी आधार कार्डचा वापर ही एकच सोपी पद्धत यंदापासून लागू केली आहे. संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरताना प्रत्येक विद्यार्थ्याने आपला आधार क्रमांक, आधार कार्डप्रमाणे नाव, लिंग, जन्मतारीख नोंदविणे आवश्यक आहे. आधार कार्डावर जन्मतारीख नसल्यास इतर रेकॉर्डप्रमाणे नोंदवावी; अन्यथा अर्ज पुढे भरताच येत नाही.

**आधार कार्ड उपलब्ध नसल्यास :** ज्यांनी आधार कार्ड काढलेलेच नाही, त्यांनी www.vidai.gov.in वरून आधार केंद्राची यादी घ्यावी व नोंदणी करावी. जेईई- मेन २०१७ परीक्षेसाठी राज्यात अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे ही परीक्षा केंद्रे आहेत. या शहरांमध्ये सीबीएसई बोर्डातर्फे मदत केंद्रे उघडलेली असून, अशा केंद्रांमध्ये जाऊन आधार कार्डची नोंदणी मोफत करावी. संकेतस्थळावर मदत केंद्रांची माहिती व पत्ता आहे. आधार कार्डची नोंदणी केल्यानंतर मिळणाऱ्या पावतीवर दर्शवलेला आधार नोंदणी क्रमांक (२८ अंकी) अर्ज भरताना नोंदविणे आवश्यक आहे. आधार नोंदणीची सोय मदत केंद्रात नसेल तर आपण आधार नोंदणीची विनंती केंद्रामध्ये केल्यानंतर त्यांच्यातर्फे 'रजिस्टर नोंदणी क्रमांक' दिला जाईल व तो अर्ज भरताना नोंदवावा.

**अत्यंत महत्त्वाचे :** आधार कार्ड योजना आल्यानंतर अत्यंत घाईने आधार नोंदणी झाली, त्यामुळे त्यामध्ये काही चुका असण्याची शक्यता आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने जेईई अर्ज भरण्यापूर्वी आधार कार्डवरील आपले नाव स्पेलिंगसह तसेच पुरुष/ स्त्री नोंदणीबरोबर आहे का ते पाहावे. जन्मतारीख आधार कार्डवर असेल तर ती बरोबर आहे का ते पाहावे. थोडक्यात शाळा सोडल्याचा दाखला; तसेच दहावी गुणपत्रिकेप्रमाणे नाव, जन्मतारीख आधार कार्डवर असणे आवश्यक आहे. सीबीएसई बोर्डातर्फे फक्त परीक्षा घेणे व मेरीट क्रमांक देणे हीच जबाबदारी असते. बोर्डातर्फे कोणतीही कागदपत्रे तपासली जात नाहीत. प्रवेश ज्या ठिकाणी दिला जातो, त्या संस्थेमार्फत कागदपत्रांची तपासणी केली जाते. जर आपणास कागदपत्रातील व आधार कार्डामधील नाव, लिंग व जन्मतारीख यामध्ये विसंगती असेल तर त्यामध्ये त्वरित बदल करणे आवश्यक आहे.

देशपातळीवरील एमबीबीएस व बीडीएस प्रवेशासाठी नीट २०१७ होणार असून, याच परीक्षेतून राज्यातील बीएएमएस, बीएचएमएस सर्व उर्वरित शाखांचे शासकीय, खासगी संस्थांमधील प्रवेश होणार आहेत. थोडक्यात आरोग्य विज्ञान शाखेतील प्रवेशासाठी 'नीट' परीक्षा देणे अनिवार्य आहे. या परीक्षेचे अर्ज याच महिन्यात अपेक्षित आहेत; तसेच त्यासाठीसुद्धा आधार कार्ड आवश्यक आहे.

## जेईई मेन २०१७ वेळापत्रक

- **ऑनलाइन फॉर्म : २ जानेवारी २०१७ पर्यंत उपलब्ध**
- **ॲडमिट कार्ड मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात**
- **परीक्षा : ऑफलाइन २ एप्रिल २०१७**
- **ऑनलाइन : ८ व ९ एप्रिल २०१७**
- **की ॲन्सर व ओएमआर शीट : १८ ते २२ एप्रिल**
- **निकाल : २७ एप्रिल २०१७**

(शब्दांकन : **ज्ञानेश्वर रायते,** बारामती)